५. आपण आपल्या संस्थेच्या अध्यक्षांचे सदरची माध्यमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर चालविण्यास तयार असल्याबाबतचे शपथपत्र (रु.२०/- च्या स्टँप पेपरवरील) आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे प्रतिस्वाक्षरीसह सादर करणे आवश्यक आहे.

६. आपली संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १९६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकत असावी. संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

७. संस्थेविरुध्द गंभिर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

८. सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखादया शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

९. सदर संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबत तक्रारी नाहीत तसेच सदर संस्थेची एखादी शाळा शासनाने ताब्यात घेण्याचे प्रकरण प्रलंबित नाही.

१०. सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावांच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.

सदरचे पत्र प्राप्त होताच वरील १ ते १० विहित बाबींची पूर्तता केली असल्याचे संस्थेने सात दिवसांचे आत

आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांना आवश्यक त्या कागदपत्रासह/प्रमाणपत्रासह कळवावे. शाळा परवानगी दिलेल्या वर्षी शाळा सुरु केलेली नसल्यास सदर पत्र प्राप्त झालेपासून सात दिवसांचे आत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद व या कार्यालयास लेखी कळवावे.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही असे.

(बाळासाहेब ओव्हाळ)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१ करिता

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे.

२/-आपण सदर संस्थेच्या मूळ प्रस्तावावरुन सविस्तर पत्यावर वरिल शाळा परवानगी देण्याचे विचाराधीन असल्याचे आपले स्तरावरुनही तात्काळ कळविण्यांत यावे. मूळ प्रस्तावित परवानगीचे ठिकाण व माध्यम याबाबत खात्री करावी व वरिल अटींच्या संदर्भात आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची/प्रमाणपत्रांची तपासणी करुन प्रस्ताव तीन दिवसात आपल्या अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा. शाळा प्रत्यक्ष् सुरु नसल्यास तसे लेखी स्वरुपात या कार्यालयास सादर करावे.

प्रत : १. मा.सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-३२.

२. मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना सविनय सादर

दिनांक : 16 JUN 2008

प्रति,

सचिव,
मराठवाडी प्रतिष्ठान,
२८/३१० प्राधिकरण निगडी, पुणे

विषय २००५ - २००६ या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नविन माध्यमिक शाळांना परवानगी देणेबाबत . . .

संदर्भ :- १.शासन पत्र क्रमांक नमाशा/२००६/( १५८/२००६) ) माशि-१,दिनांक १६.५.२००६ व दिनांक ३१.५.२००६
२. या कार्यालयाचे पत्र क्र.माध्य ३/१४/नमाशा/पुवि/२००६, दिनांक ७.६.२००६ व दिनांक १५.६.२००६
३. शासन पत्र क्रमांक नमाशा/२००६(४५७/०६)माशि-१ दि.१८.७.२००६
४..या कार्यालयाचे पत्र क्रमांक माध्य-३/१४/नमाशा/रदद/पुवि/०६, दिनांक ३१.७.२००६
५.शासन पत्र क्रमांक न्यायाप्र/२००८/(१९२/०८) माशि-१, दि.१७.३.२००८
६.या कार्यालयाचे समक्रमांक पत्र दिनांक २२.४.२००७ व दिनांक २७.५.२००८

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यांत येते की, खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थेस तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सन २००५ - २००६ या शैक्षणिक वर्षापासून **कायम विनाअनुदान** तत्वावर नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधीन आहे, असे उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक २ नुसार कळविण्यांत आले होते.

तथापी संदर्भ क्रमांक ३ नुसार शासनाने म.रा.शि.महामंडळ यांनी उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे दाखल केलेल्या याचिका क्रमांक २८९७/२००६ या याचिकेवर दिलेल्या निर्णयानुसार दिनांक १६.५.२००६ ते ३१.५.२००६ या कालावधीत दिलेले नविन माध्यमिक शाळा परवानगी आदेश रदद केले होते. त्यानुसार या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक ४ अन्वये शाळा परवानगीचे आदेश रदद झाल्याचे संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांचे मार्फत आपणांस कळविण्यांत आले होते आता उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक ५ नुसार शासनाने दिनांक १६.५.२००६ ते ३१.५.२००६ या कालावधीतील परवानगी आदेश कायम राहतील असे कळविलेले आहे. त्यानुसार आपल्या शाळेस परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधीन आहे. आपण परवानगी मिळालेल्या ठिकाणी शाळा सुरु केली नसल्यास शासन निर्णय क्रमांक माशानु/२००७/(१००१/२००७) (३) माशि-१,दिनांक १९.१०.२००७ अन्वये आपणांस नुतनीकरणाने परवानगी देण्यात येत आहे.

शासन निर्णय क्रमांक माशानु/२००७/(१००१/२००७) (३) माशि-१,दिनांक १९.१०.२००७ नुसार पुढील शैक्षणिक वर्षात (२००८-०९) शाळा सुरु न केल्यास यानंतर नुतनीकरणाच्या प्रस्तावाचा विचार केला जाणार नाही. व सदर शाळांचे परवानगी आदेश रददबातल झाले असे गहित धरण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | मराठवाडी प्रतिष्ठान, २८/३१० प्राधिकरण निगडी, पुणे | चिखली , पुणे | आठवी | इंग्रजी |

कायम विना अनुदान

आपल्या शाळेस माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींचा तसेच खालील नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवरच नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येणार आहे. आपण आपली शाळा सुरु केली असल्यास तसे लेखी स्वरुपात तात्काळ शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद व या कार्यालयास कळवावे.

१. इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेसाठी भविष्यकाळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यांत येणार नाही किंवा विदयार्थ्यांच्या फी च्या परताव्याची मागणी करण्यांत येणार नाही अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांच्या सहीचे लेखी हमीपत्र सादर करावे.
२. सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशांचे (उदा.विदयार्थ्यांच्या प्रवेशाबाबत) तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे..
३. शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. एसएसएन २१०३/(५०/०३)माशि-२,दिनांक २७ मे २००३ मधील अटी व शर्ती, कार्यपध्दती संस्थेवर बंधनकारक राहतील.
४. आपल्या संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

कायम विनाअनुदान तत्वावर/
विनाअनुदान तत्वावर/

जाक्रप्रा.प्राशि-३/खाप्राशा/मा./पुवि/२००५

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 25 NOV 2005

प्रति

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,
२. शिक्षण/प्रमुख/प्रशासन अधिकारी
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ, पिंपरी-चिंचवड.

विषय : सन २००३ - २००४ या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळेस परवानगी देणेबाबत. (माध्यम इंग्रजी)

संदर्भ : शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक व्हिएसएल/२००४ (१/१५/२००४)/प्राशि-३, दिनांक २१/६/२००४

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकनी घ्यावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून, २००३ पासून इ. १ ली च्या वर्गास ---- फक्त सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष/सुरु असलेल्या/प्रस्तावित शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विनाअनुदान तत्वावर/कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे. सदर इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १] | मराठवाडा प्रतिष्ठान, पिंपरी-चिंचवड पुणे. कायम विना अनुदान | मोरेवस्ती, चिखली जि-पुणे. | १ ली च्या वर्गास फक्त | इंग्रजी |

सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास परवानगी रद्द होईल.

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणाकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम

विधायक शिक्षा निर्माण ...
गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज सक्षम अधिकाऱ्यांकडे परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने ही परवानगी संबंधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तद्नंतर सक्षम प्राधिकाऱ्याकडे (आपणाकडे) नविन प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा, असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समितीची मान्यता मिळताच त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत माहितीस्तव सविनय सादर

१. मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
४. मा. सचिव/अध्यक्ष, मराठवाडा प्रतिष्ठान, पिंपरी-चिंचवड, पुणे.
------------------------------------------------------------,
------------------------------------------------------------,
------------------------------------------------------------.